# विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, न्यायालय, देगलुर.

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६७५/२०२५** **निशाणी क्र.०४**

| | | |
|---|---|---|
| अपराधाची तारीख | : | ०८/०८/२०२५ |
| फिर्याद दिल्याची तारीख | : | ०८/०८/२०२५ |
| फिर्यादीचे नाव,वय व पत्ता | : | सरकार तर्फे पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, मरखेल. |
| आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | १. **शेख मुजीब शादुलसाब**, वयः—३६ वर्ष, धंदाः— मजुरी, रा. मरखेल, ता. देगलुर, जि. नांदेड. |
| | | २. **बशीर महेबुबसाब कुरेशी**, वयः—४५ वर्ष, धंदाः— मजुरी, रा. मरखेल, ता. देगलुर, जि. नांदेड. |
| | | ४. **नागनाथ पुजाजी चेरे**, वयः—४० वर्ष, धंदाः— मजुरी, रा. मरखेल, ता. देगलुर, जि. नांदेड. |

**<u>अपराधाचे विवरण</u> :**

तुम्ही दिनांक ०८/०८/२०२५ रोजी ०३.३० वाजता मौजे मरखेल येथे तांडा बार चे समोर मोकळया जागेत तुम्ही आरोपी संगनमत करुन अवैधरित्या, बिनापरवाना बेकायदेशिर आरोपी क्र.१ हा आरोपी क्र.३ व ५ यांचे सांगण्यावरुन श्रीदेवी, मिलन, टाईम बाजार, कल्याण या नावाचे मटका खेळण्यासाठी व खेळविण्यासाठी व्हॉटसॲप ग्रुप तयार करुन त्यावर लोकांकडुन मटक्याचे

आकडे घेवुन पैशाचे हार जीत वर जुगार लोकांकडुन पैसे घेवुन खेळत व खेळवित असताना नगदी ११९०/— रुपये व दोन मोबाईल किंमती १२,०००/— रुपये असे एकुण १३,१९०/— चा मुद्देमाल मिळुण आला व आरोपी क्र.२, ४ व ६ हे त्यांचे कडील मोबाईलवर व्हाट्सअॅप क्रमांकावरुन मटक्याचे आकडे आरोपी क्र. १ याचे मोबाईलवर लावुन पैशाचे हार जीत वर जुगार खेळत असताना आढळुन आले आणि त्याद्वारे तुम्ही **महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत कलम १२ (अ)** नुसार अपराध केला.

DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Digitally signed by DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Date: 2025.11.27 12:26:45 +0530

दिनांक २६/११/२०२५

**(राघवेंद्र एन. देव)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रेणी,
न्यायालय, देगलुर.

## <u>आरोपीचे प्रतिकथन</u>

प्रश्न क्र. १ : तुम्हाला दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर :
प्रश्न क्र. २ : तुमच्यावर लावण्यात आलेला आरोप वाचुन दाखविला तो तुम्हाला समजला काय?
उत्तर :
प्रश्न क्र. ३ : तुम्हाला शासनाकडुन सरकारी वकील पाहिजे काय?
उत्तर :
प्रश्न क्र.४ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय?
उत्तर :

१.........................    २.........................
आरोपी क्र.१ ची सही    आरोपी क्र.२ ची सही

४.........................
आरोपी क्र.४ ची सही
दिनांक २६/११/२०२५

DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Digitally signed by DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Date: 2025.11.27 12:26:52 +0530

**(राघवेंद्र एन. देव)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रेणी,
न यायालय, देगलुर.

## न्यायनिर्णय

(अधिघोषणा दिनांक २६/११/२०२५)

आरोपी **१. शेख मुजीब शादुलसाब**, **२. बशीर महेबुबसाब कुरेशी**, **४. नागनाथ पुजाजी चेरे** हे प्रत्यक्ष हजर राहून स्वेच्छेने गुन्हा कबूल करीत आहेत. त्यांना कबूलीच्या परिणामाची माहिती देण्यात आली. ते स्वइच्छेने दोष कबूल करतात. आरोपी हे कुठल्याही दबावाशिवाय आणि स्वत:च्या मर्जीने गुन्हा कबूल करीत आहेत याची खात्री करण्यात आली. त्याच्यावर त्यांचे कुटुंबीय अवलंबून आहेत. आरोपींचे विरुध्द गुन्हयाच्या अनुषगांने पुर्वइतिहास नाही. आरोपींचा हा पहिलाच गुन्हा आहे. आरोपींचे सदर कथन आणि गुन्हा कबुल करण्यात दाखविलेला प्रांजळपणा लक्षात घेता पुढील आदेश न्यायोचित ठरेल, असे ठाम मत झाल्याने पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येते.

## आदेश

१. आरोपी **१. शेख मुजीब शादुलसाब**, **२. बशीर महेबुबसाब कुरेशी**, **४. नागनाथ पुजाजी चेरे** यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत कलम १२ (अ) खालील गुन्हृयासाठी दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत कलम १२ (अ) खालील गुन्हयाकरिता न्यायालय उठेपर्यंत शिक्षा व प्रत्येकी रू.**२००/—** (**रूपये दोनशे फक्त**) द्रव्यदंडाची शिक्षा फरमावण्यात येते आणि आरोपींनी द्रव्यदंड न भरल्यास त्यांना **१५** दिवस साधी कारावासाची शिक्षा सुनावण्यात येते.

३. **आरोपी क्र.३ प्रकाश दत्तात्रय बेंजरपे, आरोपी क्र.५ अमोल मारोती जाधव व आरोपी क्र.६ माजीद रफीयोद्दीन शेख** यांच्या विरुध्द प्रकरण प्रलंबीत ठेवण्यात येत आहे.

DEV RAGHAVENDRA NARHARRAO

Digitally signed by DEV RAGHAVENDRA NARHARRAO
Date: 2025.11.27 12:26:58 +0530

ठिकाण : देगलुर
दिनांक २६/११/२०२५

**(राघवेंद्र एन. देव)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रेणी,
न्यायालय, देगलुर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. A.K. Mohammad |
| Name of Court and | Shri. Raghvendra N.Dev C.J.J.D. J.M.F.C., Degloor |
| Date of Dictation | 26.11.2025 |
| Judgment signed by the P.O.on | 26.11.2025 |
| Judgment/Order uploaded on | 27.11.2025 |